# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६६/२०११-१२ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बाबू शामराव माळी,<br>मु.पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बाबू शामराव माळी, मु.पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. १५.२.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहकाने आपली शेत जमीन गट क्र. ९६/१ येथे नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी चलन रु. ५०५०/- दि. २५.४.२०११ रोजी पावती क्र. ८७३८३४८ नुसार भरले आहे. चाचणी अहवाल त्याचदिवशी दिला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. २४.७.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते, तो आजतागायत मिळाला नाही. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. ५.१२.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश केले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत - परवानेधारकाला एका निश्चित कालावधीत कृती मानके पूर्ण करण्याचे मंच आदेश देऊ शकते. त्यामुळे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देणे बाबत आदेश वि.प.स द्यावेत.

वितरण कंपनीने आपल्या दि. १०.४.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने शेतीपंप वीज जोडणीसाठी दि. २५.४.२०११ ला चलन भरुन त्याचदिवशी चाचणी अहवाल दिलेला आहे. परंतु चाचणी अहवालाप्रमाणे जागेची तपासणी केली असता जागेवर मोटारपेटी व मोटर नाही असे आढळले. तसेच ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेले आहेत अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. दि. ३१.३.२०११ च्या अगोदर चलन भरलेले एकूण ६७ लोकांचे लाईन ओढून कनेक्शन देणे बाकी आहे. तसेच दि. ३१.३.२०११ नंतर चलन भरुन प्रलंबित यादी एकूण ४३४ ची आहे, त्यामध्ये श्री. माळी यांचे जेष्ठता यादीमध्ये नांव १८ क्रमांकावर आहे. तसेच श्री. माळी यांनी सन २०१०-११ मध्ये ' महावितरण आपल्या दारी ' मध्ये चलन भरलेले आहे व त्यांचे कनेक्शनसाठी सध्या तीन पोल उभा केलेले आहेत व सध्या लाईन ओढून देण्याचे काम चालू आहे. लाईनचे काम झाल्यानंतर श्री. माळी यांचे सर्व्हीस कनेक्शनमध्ये कनेक्शन होणार आहे व ते कनेक्शन लवकरच देणेत येईल असे नमूद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. १२.४.२०१२ ला दुपारच्या सत्रात घेण्यात आली. त्यावेळी ग्राहक प्रतिनिधी गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता श्री. कदम, कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी लेखी अहवालात नमूद केलेले मुद्दे मांडले व ग्राहकास लाईन ओढून दि. ३०.५.२०१२ पर्यंत वीज जोडणी देतो असे सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाची वीज जोडणी एका निश्चित कालावधीत व्हावी ही मागणी मंजूर करणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय

कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार ग्राहकाने शेतीपंप वीज जोडणीसाठी दि. २५.४.२०११ रोजी चलन चलन भरुन त्याचदिवशी चाचणी अहवाल दिलेला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. २४.७.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते. उलट वि.प.ने आपल्या लेखी अहवालात ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेले आहेत अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहकाच्या कनेक्शनसाठी तीन पोल उभा केलेले आहेत व सध्या ती लाईन ओढून देण्याचे काम चालू आहे. त्या लाईनचे काम झाल्यानंतर श्री. माळी यांचे कनेक्शन देण्यात येईल. त्यामुळे केवळ दि. ३१.३.२०११ पर्यंत चलन भरले नाही म्हणून कृती मानके तरतुदींचे पालन करणे वितरण कंपनी टाळू शकत नाही. कृती मानके तरतुदींचे पालन करणे वि.प.वर बंधनकारक आहे. वि.प.च्या वरिष्ठ कार्यालयाच्या परिपत्रकामुळे कृती मानके तरतुदींचा प्रभाव किंवा वैधता कंपनी नाकारु शकत नाही. ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील कलम ८.२ नुसार मंच ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश देऊ शकते. ग्राहकाने चलनाचे पैसे भरुन जवळजवळ १२ महिने झालेत. ग्राहकास ३ महिन्यानंतर वीज पुरवठा दिला नाही याबद्दल वि.प.ने दिलेले स्पष्टीकरण ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे ग्राहकाची ठराविक मुदतीत वीज जोडणी मिळावी ही मागणी मंजूर करणे योग्य होईल. मुद्दा क्र.१ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे ग्राहकास दि. ३०.५.२०१२ पर्यंत त्यांची शेत जमीन गट क्र. ९६/१ येथे शेती पंपास वीज जोडणी द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल मंचास द्यावा.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com